TATA

# टाटा केमिकल्स लिमिटेड

कॉर्पोरेट आयडेन्टिटी नंबर : एल२४२३९ एमएच१९३९ पीएलसी००२८९३
नोंदणीकृत कार्यालय : बॉम्बे हाऊस, २४, होमी मोदी स्ट्रीट, फोर्ट, मुंबई-४००००१.
दू. क्र. : ०२२६६६५ ८२८२, फॅक्स क्र. : ०२२ ६६६५ ८१४४.
ई-मेल अ‍ॅड्रेस : investors@tatachemicals.com वेबसाईट : www.tatachemicals.com

## सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, एजीएमच्या सूचनेत मांडलेले कामकाज करण्यासाठी टाटा केमिकल्स लिमिटेडच्या सभासदांची ७७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) गुरुवार, ११ ऑगस्ट, २०१६ रोजी दु. ३.०० वा. बिर्ला मातुश्री सभागार, १९, सर विठ्ठलदास ठाकरसी मार्ग, न्यू मरिन लाईन्स मुंबई-४०००२० येथे होणार आहे.

३१ मार्च, २०१६ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षासाठी लेखापरिक्षित अलिप्त आणि एकत्रित वित्तीय विवरणे, संचालक मंडळाचा अहवाल आणि लेखापरीक्षकांचा अहवाल यांच्यासह सभेची सूचना आणि स्पष्टीकरणात्मक निवेदन, ज्यांनी पत्रव्यवहाराच्या कारणासाठी कंपनी/डिपॉझिटरी पार्टिसिपंट किंवा रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्स्फर एजंटस्कडे त्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेस नोंदवले आहेत त्या सभासदांना १५ जुलै, २०१६ रोजी इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पाठवले आहेत. ज्या सभासदांनी त्यांचे ई-मेल अ‍ॅड्रेस नोंदवलेले नाहीत किंवा हार्ड कॉपीजसाठी विनंती केली त्यांना वार्षिक अहवाल त्यांच्या नोंदवलेल्या पत्त्यावर संमत माध्यमातून पाठवले आहेत आणि हे पाठवण्याचे काम १८ जुलै, २०१६ रोजी पूर्ण केले आहे.

सभासदांना याद्वारे कळविण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम १०८, सहवाचता वेळोवेळी सुधारित कंपन्यांचे (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ४४ च्या तरतुदींच्या अनुपालनात कंपनी तिच्या सभासदांना इलेक्ट्रॉनिक माध्यमातून ७७ व्या एजीएममध्ये मत देण्याचा त्यांचा अधिकार वापरण्याची सुविधा पुरवित असून नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल) ने पुरविलेल्या ई-व्होटिंग सेवेमार्फत (रिमोट-ई-व्होटिंग) कामकाज करता येईल.

ई-व्होटिंगसाठीचे निर्देश, एजीएमच्या सूचनेत दिले आहेत. सभासदांनी कृपया, खालील बाबी ध्यानात ठेवाव्यात.

ए) रिमोट ई-व्होटिंगला सोमवार, ८ ऑगस्ट, २०१६ (स. ९.०० भाप्रवे) रोजी सुरुवात होईल आणि **बुधवार, १० ऑगस्ट, २०१६ (सं. ५.००) (भाप्रवे)** वा. ते संपेल. त्यानंतर मतदानासाठी, एनएसडीएलकडून ई-व्होटिंग मॉड्युल निष्क्रिय केले जाईल आणि सभासदांना सदर तारीख आणि वेळेनंतर इलेक्ट्रॉनिक पध्दतीने मत देण्याची परवानगी नसेल.

बी) सभासदांचे मताधिकार रिमोट ई-व्होटिंगमार्फत मतदानासाठी **४ ऑगस्ट, २०१६ ("कट-ऑफ डेट")** रोजीस कंपनीच्या भरणा झालेल्या समभाग भांडवलातील त्यांच्या हिश्श्याच्या सम प्रमाणात असतील. एकदा इलेक्ट्रॉनिक व्होटिंग सिस्टीमने किंवा गुप्त मतदान/मतपत्रिकेद्वारा मतदान करण्याची सुविधा सभेत देखील उपलब्ध करून देण्यात येईल आणि रिमोट ई-व्होटिंग किंवा गुप्त मतदान पत्रिकेमार्फत ज्या सभासदांनी आधी त्यांचे मत दिलेले नसेल ते सभेत त्यांचा मताधिकार वापरण्यास पात्र असतील. कट-ऑफ डेटला ज्या व्यक्तीचे नाव सभासदांच्या नोंदवहीत किंवा डिपॉझिटरीजनी ठेवलेल्या लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत नोंदवले असेल, केवळ तेच रिमोट ई-व्होटिंग तसेच एजीएममध्ये मतदान करण्याची सुविधा मिळवण्यास हक्कदार असतील.

सी) एजीएमची सूचना पाठवल्यानंतर जर कोणत्याही व्यक्तीने कंपनीचे समभाग संपादित करून कंपनीचा एक सभासद झाली असेल व कट-ऑफ डेटला समभाग धारण करत असेल तर, त्या evoting@nsdl.co.in ला एक विनंती पाठवून किंवा एनएसडीएलने पुरविलेल्या टोल फ्री नंबर : १८००-२२२-९९० वर संपर्क साधून लॉगिन आयडी व पासवर्ड मिळवू शकतात.

डी) सभेपूर्वी ज्या सभासदांनी रिमोट ई-व्होटिंगने किंवा मतपत्रिकेद्वारा त्यांचे मत दिले असेल, ते देखील सभेला हजर राहू शकतात परंतु, एजीएममध्ये पुन्हा मत देण्यास ते हक्कदार नसतील.

अन्य बाबींसह ७७ व्या एजीएमची सूचना, हजेरी पत्र आणि प्रतिपत्री प्रपत्रासह असलेला आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीचा कंपनीचा वार्षिक अहवाल लिंक : **http://www.tata-chemicals.com/investors/downloads/annual_reports/tata-chemicals AR 15 16.pdf** वरून डाऊनलोड करता येतील. तसेच एनएसडीएलची वेबसाईट **www.evoting.nsdl.com** वर देखील उपलब्ध आहे.

रिमोट-ई-व्होटिंग प्रक्रिया, गुप्त मतदान पत्रिकेने मतदान आणि सभेत व्हावयाचे मतदान सुरळीत आणि पारदर्शीपणे पार पाडण्यासाठी तपासणी अधिकारी म्हणून कंपनीच्या संचालक मंडळाने पारिख अँड असोसिएटस्, कंपनी सेक्रेटरीजचे श्री. पी. एन. पारिख व ते नसल्यास श्रीमती जिग्यासा वेद यांची नेमणूक केली आहे.

सभा झाल्यापासुन अठ्ठेचाळीस तासात रिमोट ई-व्होटिंग व एजीएममधील मतदानाचा निकाल घोषित केला जाईल. तपासणी अधिकाऱ्यांच्या अहवालासहित घोषित झालेला निकाल, तो घोषित झाल्यावर तातडतोब कंपनीची वेबसाईट **www.tatachemicals.com** आणि एनएसडीएलची वेबसाईट **www.evoting.nsdl.com** वर प्रदर्शित केला जाईल आणि कंपनी सूचिबध्द असलेले शेअर बाजार म्हणजेच बीएसई लिमिटेड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेड येथेही निकाल कळवले जातील.

जर कोणत्याही सभासदाची वार्षिक अहवालाची एक छापील प्रत मिळण्याची इच्छा असेल तर कंपनी सभासदाकडून विनंती प्राप्त झाल्यावर ती विनामूल्य पाठवेल, अशी विनंती **csg-annualreports@tsrdarashaw.com** वर पाठवावी.

रिमोट ई-व्होटिंगशी संबंधित कोणत्याही चौकशा किंवा तक्रारी श्री. राजीव रंजन, असिस्टंट मॅनेजर, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड, ट्रेड वर्ल्ड, 'ए' विंग, कमला मिल्स कंपाऊंड, सेनापती बापट मार्ग, लोअर परळ, मुंबई-४०००१३ येथे त्यांच्या नियुक्त ई-मेल आयडी - **evoting@nsdl.co.in** किंवा **rajivr@nsdl.co.in** वर किंवा दू. क्र. : ९१ २२ २४९९ ४७३८/१८००-२२२-९९० वर कराव्या.

**बुक क्लोजर :**

पुढे सूचना देण्यात येते की, कंपनी अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम ह्यांना अनुसरून, ७७ व्या एजीएमसाठी व सभासदांनी घोषित केल्यास, आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी लाभांशाचे प्रदान करण्यासाठी कंपनीच्या सभासदांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तके गुरुवार, ४ ऑगस्ट, २०१६ ते गुरुवार, ११ ऑगस्ट, २०१६ (दोन्ही दिवसांसह) बंद राहतील.

संचालक मंडळाच्या आदेशाने
टाटा केमिकल्स लिमिटेडसाठी
सही/-
राजीव चंदन
जनरल काऊन्सेल अँड कंपनी सेक्रेटरी

ठिकाण: मुंबई
दिनांक : १८ जुलै, २०१६.